R.No.MAHMAR/25/A3029

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# दैनिक महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक १०३ शुक्रवार दि.३१ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## महायुतीत मिठाचा खडा पडला! 'या' आमदाराने दिला 'स्वबळाचा' नारा



जळगाव : येत्या काही दिवसांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका पार पडणार आहेत. हि लढत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी होणार आहेत. यादरम्यान जळगावच्या पाचोरा, भडगाव मतदारसंघाचे शिवसेनेचे (शिंदे गट) आमदार किशोर पाटील यांनी जाहीरपणे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत स्वबळाचा नारा दिला आहे. त्यामुळे महायुतीमध्ये मिठाचा खडा पडला आहे. त्यामुळे पाचोरा, भडगाव मतदार संघातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता शिवसेना आणि भाजप स्वबळावर लढणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

किशोर पाटील यांचा भाजपवर आरोप आमदार किशोर पाटील यांनी यावेळी भाजपवर थेट आरोप करत म्हटले की, दोन टर्मपासून विरोधक गुपचूप किंवा थेट उमेदवार देत मला थांबवण्याचा प्रयत्न करत आहेत, पण जनता आणि शिवसैनिक माझ्या पाठीशी आहेत.भाजपाच्या काही नेत्यांनी पाठीत खंजीर खूप असणार असाल तर, अशा लोकांसोबत राहण्यापेक्षा समोरासमोर लढणं कधीही बरे. त्यामुळे पाचोरा-भडगाव मतदारसंघात युती होणार नाही आणि शिवसेना एकहाती निवडणूक लढेल,असे किशोर पाटील यांनी जाहिर केले आहे.

निर्धार मेळाव्याचे आयोजन १ नोव्हेंबर रोजी माझ्या वाढदिवसानिमित्त कृषी उत्पन्न बाजार समिती, पाचोरा या ठिकाणी निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याला सर्व शिवसैनिकांनी, बंधू - भगिनींनी, शेतकरी बांधवानी उपस्थित राहून शुभ आर्शिर्वाद द्यावेत असे आवाहन आमदार किशोर पाटील यांनी केले आहे.

भाजपकडून देखील प्रत्युत्तर किशोर पाटील यांनी पाचोरा भडगाव मतदार संघात कोणाशीही युती न करण्याची भूमिका घेतल्याने चाळीसगाव विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे आमदार मंगेश चव्हाण यांनीही लगेच आढावा बैठक घेत त्यांची भूमिका जाहीर केली.भाजपलाही स्वबळावर लढावे लागेल असे मंगेश चव्हाण म्हणाले.

## मतचोरी विरोधात मविआचा उद्या भव्य मोर्चा

मुंबई : शनिवार दि. १ नोव्हेंबर शनिवारी निवडणूक आयोगाचा बेजबाबदार कारभार, मतचोरी, मतांमधील घोळ, निवडणुकीतील गैरव्यवहार याबाबतचा सत्याचा मोर्चा निघणार आहे. लोकांना सत्य कळावे आणि असत्य जनतेसमोर जावे यासाठी विरोधी पक्षाने, महाविकास आघाडीचे सर्व पक्ष, मनसे आणि जे जे सर्व या गोष्टींच्या विरोधात आहेत, मतदार देखील मोर्चात सामील होतील.



मोर्चा दुपारी १ वाजता फॅशन स्ट्रिटवरून सुरू होईल. मेट्रो सिनेमामार्ग मुंबई महापालिकेच्या प्रवेशद्वारावर थांबले अशी माहिती उद्धव ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी दिली. मतदार यादीतील घोळासंदर्भात येत्या १ नोव्हेंबर रोजी निवडणूक आयोगाविरोधात महाविकास आघाडीतील पक्षांचा मोर्चा निघणार आहे.

आघाडीचे नेते आणि मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे, डाव्या पक्षाचे सर्व प्रमुख नेते उपस्थित असतील आणि मोर्चाला मार्गदर्शन करतील. केवळ राजकीय पक्ष नाही तर ज्यांना आपले मत चोरीला गेले असे वाटते आणि ज्या चुकींच्या मतावर सरकारमध्ये बसले असे वाटते ते लोकही मोर्चात सहभागी होतील असे अनिल परब म्हणाले.

पोलिसांना भेटलो. सूचना घेतल्या. मोर्चाचे रुट प्रसिद्ध केले आहेत. उद्या क्यूआर कोड पाठवू. म्हणजे लोकांची व्यवस्था होईल. मुंबईवरून येणा-या दोन लोकांची वाहन व्यवस्था राहील. मतचोरीबाबत प्रमुख नेते पुढील आंदोलनाची दिशा ठरवतील असे अनिल परब म्हणाले.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या खर्च मर्यादेत दीडपट वाढ



मुंबई : प्रतिनिधी राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी राज्य निवडणूक आयोगाने एक महत्त्वाचा निर्णय घेत उमेदवारांच्या निवडणूक खर्च मर्यादेत मोठी वाढ केली आहे. बदलती आर्थिक परिस्थिती, वाढती महागाई आणि प्रचार खर्चातील प्रचंड वाढ लक्षात घेता आयोगाने निवडणूक खर्चात वाढ केली आहे.

महापालिका निवडणुकांसाठी आतापर्यंत सदस्यसंख्येच्या आधारे खर्च मर्यादा ठरवली जात होती, मात्र आता आयोगाने ती वर्गवारीनुसार निश्चित केली आहे. नव्या नियमानुसार मुंबई, पुणे आणि नागपूर या अ वर्गातील महापालिकांतील नगरसेवक उमेदवारांना १५ लाख रुपयांपर्यंत खर्च करण्याची परवानगी मिळणार आहे.

पिंपरी-चिंचवड, ठाणे आणि नाशिकसाठी ही मर्यादा १३ लाख रुपये निश्चित करण्यात आली आहे. कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर आणि वसई-विरार या ब वर्गातील महापालिकांतील उमेदवारांना ११ लाखांपर्यंत खर्चाची मुभा देण्यात आली आहे. तर ड वर्गातील इतर १९ महापालिकांमध्ये उमेदवारांना ९ लाख रुपयांचा खर्च करण्याची परवानगी देण्यात आली आहे. ही सुधारित मर्यादा महागाई आणि आर्थिक वास्तव लक्षात घेऊन निश्चित करण्यात आल्याचे आयोगाच्या सूत्रांनी सांगितले.

नगर परिषद आणि नगरपंचायतींसाठीही खर्च मर्यादा तद्नुसार बदलण्यात आल्या आहेत. अ वर्ग नगर परिषदांसाठी नगरसेवकांना ५ लाख आणि थेट निवडणूक लढवणा-या नगराध्यक्षांना १५ लाख रुपयांपर्यंत खर्च करता येणार आहे. ब वर्गात नगरसेवकांसाठी ३.५ लाख आणि नगराध्यक्षांसाठी ११.२५ लाख, तर क वर्गातील नगर परिषदांमध्ये नगरसेवकांसाठी २.५ लाख आणि नगराध्यक्षांसाठी ७.५ लाख रुपये खर्चाची मर्यादा ठरवण्यात आली आहे. नगरपंचायतींमध्ये मात्र नगरसेवकांसाठी २.२५ लाख आणि नगराध्यक्षांसाठी ६ लाख रुपये अशी मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. या निर्णयामुळे स्थानिक स्तरावरील उमेदवारांना प्रचाराचे नियोजन वास्तवाशी सुसंगत ठेवता येणार असून, अपारदर्शक खर्च कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## शेतक-यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार

मुंबई : प्रतिनिधी राज्य सरकारने अतिवृष्टीग्रस्त शेतक-यांना जाहीर केलेली मदत अद्यापही मिळाली नसल्याची ओरड होत असताना आता पंतप्रधान पीक विमा योजनेंतर्गत शेतक-यांना ५ रुपये, ८ रुपये व १३ रुपयांची मदत करण्यात आल्याची संतापजनक बाब समोर आली आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या घटनेवर संताप व्यक्त करत सरकारने शेतक-यांच्या जखमेवर मीठ चोळले असल्याचे सांगत संताप व्यक्त केला आहे.



यंदा राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत अतिवृष्टी झाली. विशेषत: मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यांतील पीक-पाण्याचे मोठे नुकसान झाले. अनेक ठिकाणी शेतजमीनच खरडून गेल्यामुळे रबी हंगाम कसा घ्यायचा? हा प्रश्न शेतक-यांपुढे उभा राहिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारने या शेतक-यांना दिलासा देण्यासाठी ३२ हजार कोटींचे पॅकेज घोषित केले. तसेच ही मदत दिवाळीपूर्वी शेतक-यांच्या खात्यात वर्ग करण्याची ग्वाहीही दिली. पण दिवाळी संपून आठवडा होत आला तरी ही मदत शेतक-यांना मिळाली नसल्याचा आरोप होत आहे.

५ रुपयांत शेतकरी जगणार कसा? त्यानंतर आता पीक विमा योजनेतही शेतक-यांना ५-१० रुपयांची मदत करण्यात आल्याची संतापजनक बाब उजेडात आली आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणी सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. ते म्हणाले, राज्यात शेतक-यांवर अस्मानी संकट आले, शेतक-यांना मदत मिळणे दूरच उलट प्रधानमंत्री पीक विमा योजनेत शेतक-यांची अवहेलना करण्यात आली आहे. अकोला येथील शेतक-यांना ५ रुपये, ८ रुपये, १३ रुपये अशी मदत करण्यात आली आहे. याला जखमेवर तिखट चोळणे म्हणतात.

एकीकडे हातातील पीक गेले, जे आहे त्या शेतमालाला भाव मिळत नाही. जे नुकसान झाले त्याचा विमा असा पाच रुपये मिळणार असेल तर शेतकरी जगणार कसा? शेतक-यांना मदत सोडा पण त्यांचा असा अपमान करू नका, असे ते म्हणाले.

अकोला जिल्ह्यातील कुटासा परिसरातील दिनोडा, मरोडा, कावसा व रेल या गावांतील शेतक-यांच्या खात्यात पीक विमा योजनेंतर्गत नुकसान भरपाई म्हणून ५ ते २७ रुपयांची मदत जमा झाली आहे. अरुण राऊत या शेतक-याच्या खात्यावर ५ रुपये ८ पैसे, संदीप घुगे यांना ५ रुपये, गणपत सांगळे यांना १३ रुपये, विजय केंद्रे याना १४ रुपये ७ पैसे, केशव केंद्रे यांना १६ रुपये १५ पैसे, आदित्य मुरकुटे यांना २१ रुपये ८५ पैसे व उमेश कराड यांच्या खात्यावर २७ रुपये ५ पैसे जमा झाले आहेत. तुटपुंजी रक्कम मिळालेले हे शेतकरी प्रातिनिधिक आहेत. याशिवायही अनेक शेतक-यांच्या खात्यावर अशीच तुटपुंजी रक्कम जमा झाली आहे. या संतप्त शेतक-यांनी बुधवारी काँग्रेस प्रवक्ते कपिल ढोके यांच्या नेतृत्वात जिल्हाधिका-यांची भेट घेऊन ही मदत सरकारला परत केली.

## रमेशआप्पा जनतेचे आमदार ! कामगिरी दमदार !!

### रेणापूर शहराच्या विकासासाठी आणखी ८ कोटीचा निधी मंजूर

लातूर : - ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून रेणापूर शहरातील विविध विकास कामासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून तब्बल ८ कोटी २१ लक्ष रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. गेल्या पंधरवाड्यातच १० कोटी रुपयाचा निधी प्राप्त झाला असून आ. कराड यांच्यामुळेच रेणापूर शहराच्या चौफेर सर्वांगीण विकासाला गती मिळत असल्याने रेणापूर येथील नागरिकांनी मोठे समाधान व्यक्त केले आहे.

भारतीय जनता पार्टीचे नेते श्री. रमेशआप्पा कराड हे ख-या अर्थाने लातूर ग्रामीण मतदार संघातील जनतेचे आमदार असून त्यांनी मतदार संघातील गावागावात वाडी वस्तीत मोठ्या प्रमाणात निधी आणून कामगिरी दमदार असल्याचे कृतीतून दाखवून दिले आहे. रेणापूर नगरपंचायत भाजपाच्या ताब्यात आल्यापासून राज्यातील महायुती शासनाच्या माध्यमातून कोट्यावधी रुपये खर्चाच्या इंनडोर क्रीडा संकुल, प्रशासकीय इमारत, पाणीपुरवठा योजना, श्री रेणुका देवी मंदिर भक्तनिवास, बालाजी मंदिर परिसरात भव्य सभागृह, रेणा नदीवर घाट बांधकाम, अशोक सम्राट बौद्ध विहार, मुस्लिम बांधवांसाठी शादीखाना, विविध समाजांची समाज मंदिरे, अंतर्गत सिमेंट काँक्रीट रस्ते, नाली बांधकाम, अंगणवाडी बांधकाम, पथदिवे, वाचनालय विकसित करणे यासह विविध कामासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी आ. रमेशआप्पा कराड यांनी मंजूर करून आणला. रेणापूर शहराच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त झाला असून यामुळे रेणानगरीच्या विकासाला गती मिळाली आहे.

विविध मंजूर झालेल्या कामापैकी काही कामे पूर्ण झाली आहेत काही कामे प्रगतीपथावर आहेत तर काही कामे येत्या काळात सुरू होणार असून शहरातील उर्वरित इतरही कामांना मान्यता मिळावी यासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि जिल्ह्याचे पालकमंत्री मा. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. केलेल्या पाठपुराव्यामुळे जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगर उत्सव महाअभियान योजनेतून ३ कोटी ३९ लक्ष ६९ हजार, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्ती सुधार योजनेतून १ कोटी ४७ लक्ष २७ हजार, नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजनेतून ३ कोटी ३५ लक्ष ५५ हजार असे एकूण ८ कोटी २१ लक्ष रुपयाचा निधी मंजूर झाला आहे.



सदरील मंजूर निधीतून विविध प्रभागात सिमेंट रस्ते, नाली बांधकामासह नाला बांधकाम, दलित वस्ती स्मशानभूमी बांधकाम, नरसिंह मंदिर सभागृह बांधकाम, नरहरी मंदिर सभागृह बांधकाम, महादेव मंदिर सभागृह बांधकाम, नरसिंह मंदिर बांधकाम असे एकूण २१ कामांना मान्यता मिळाली आहे. रेणापुर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर करून दिल्याबद्दल भाजपाचे नेते आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, माजी नगराध्यक्षा आरती राठोड, भाजपाचे चंद्रकांत कातळे, सुधीर तोडकरी, श्रीकृष्ण मोटेगावकर, दत्ता सरवदे, अच्युत कातळे, दिनकर राठोड, विजय चव्हाण, गणेश चव्हाण, शेख अजीम, दिलीप आकनगिरे, उत्तम चव्हाण, राजकुमार आलापुरे, उज्वल कांबळे, महेश गाडे, अंतराम चव्हाण, मारूफ आत्तार, उत्तम घोडके, रमा चव्हाण, लखन आवळे, धम्मानंद घोडके, संतोष राठोड, अंकुश मोटेगावकर, दिलीप चव्हाण, सोपान सातपुते, संजय वीरुळे, हनुमंत भालेराव, अमृतेश्वर स्वामी, नंदकुमार बड़े, शेख सलीम, शेख मकसूद, गणेश माळेगावकर, रफिक शिकलकर, शरद चक्रे, हरी पांचाळ, मनोज चक्रे, सुभाष राठोड, सचिन शिरसकर, टिकू दळवी, शिवाजी भावे, विकी राजे, आवेश कुरेशी, गणेश भोकरे, रोहित खुमसे, पप्पू कुडके यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते लोकप्रतिनिधी पदाधिकारी यांनी आभार व्यक्त केले आहेत.

## प्राध्यापक भरतीला 'लाडकी'चा फटका

मुंबई : प्रतिनिधी राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेला प्रचंड प्रतिसाद मिळत असताना, या योजनेसाठीच्या निधी व्यवस्थापनाचा फटका आता शिक्षण क्षेत्रालाही बसू लागला आहे. राज्यातील उच्च व तंत्रशिक्षण विभागातील पाच हजारांहून अधिक प्राध्यापकांच्या भरती प्रक्रियेला सध्या वित्त विभागाकडून अद्याप मंजुरी न मिळाल्याने ही प्रक्रिया ठप्प आहे. प्राध्यापक भरती वेळेत न झाल्यास विद्यापीठांच्या राष्ट्रीय मानांकनावर प्रतिकूल परिणाम होईल, अशी भीती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, राज्यात सध्या जवळपास ११ हजार प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत. त्यापैकी ५ हजार १२ पदांच्या भरतीसाठी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सरकारकडे प्रस्ताव सादर केला होता. या भरतीसाठी परवानगी मिळाल्यानंतर पुढील टप्प्यात निधी वाटपाची प्रक्रिया अपेक्षित होती. मात्र, वित्त विभागाकडून याला अद्याप मंजुरी न मिळाल्याने ही प्रक्रिया ठप्प आहे.

अनौपचारिक चर्चेत चंद्रकांत पाटील यांनीही प्राध्यापक भरती वेळेत न झाल्यास विद्यापीठांच्या राष्ट्रीय मानांकनावर प्रतिकूल परिणाम होईल, अशी भीती व्यक्त केली आहे. आधीच राज्यातील अनेक विद्यापीठांचे ग्रेडिंग घसरले आहे, आणि ही भरती रखडल्यास परिस्थिती आणखी बिकट होऊ शकते, असा इशारा त्यांनी दिला आहे.

सरकारवर आर्थिक ताण वाढला दरम्यान, लाडकी बहीण योजना सध्या राज्य सरकारच्या प्रमुख सामाजिक उपक्रमांपैकी एक मानली जात आहे. या योजनेसाठी महिलांना दरमहा १५०० रुपये देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, या योजनेंतर्गत लाखो लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी सरकारवर आर्थिक ताण वाढला असून इतर विभागांच्या निधीवर मर्यादा घालावी लागत असल्याची चर्चा मंत्रालयात सुरू आहे. शिक्षण, सार्वजनिक बांधकाम आणि आरोग्य अशा काही विभागांतील मंजूर प्रकल्पांना निधी अपुरा पडत असल्याचे संकेत मिळत आहेत. परिणामी, लाडकी बहीण योजनेचा अप्रत्यक्ष परिणाम आता प्राध्यापक भरतीसारख्या अत्यावश्यक प्रक्रियांवरही दिसू लागला आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर थेट परिणाम उच्च व तंत्रशिक्षण विभागाने प्राध्यापकांच्या भरतीला प्राधान्य देण्याची भूमिका कायम ठेवली असली, तरी वित्त विभागाकडून मंजुरीशिवाय प्रक्रिया पुढे जाऊ शकत नाही. सेवानिवृत्त झालेल्या हजारो प्राध्यापकांच्या जागा रिक्त असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा थेट परिणाम होत आहे. काही महाविद्यालयांमध्ये एकाच प्राध्यापकावर तीन-तीन विषयांचे ओझे असल्याची परिस्थिती आहे. शिक्षणाची गुणवत्ता टिकवण्यासाठी आणि मानांकन सुधारण्यासाठी तातडीने ही भरती प्रक्रिया सुरू करण्याची गरज असल्याचे शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे.

अभ्यासक्रम, संशोधन दोन्ही बाबतीत अडचणी राज्यातील महत्त्वाच्या विद्यापीठांमध्ये लवकरच नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होणार आहे. अशातच प्राध्यापकांची भरती रखडल्याने अभ्यासक्रम पूर्ण करणे आणि संशोधन कार्य चालवणे या दोन्ही बाबतीत अडचणी निर्माण होऊ शकतात. शिक्षक संघटनांनीही या प्रकरणात सरकारकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

## संपादकीय

# नवा आयोग, नवे वेतन!

केंद्रीय मंत्रिमंडळाने आठव्या वेतन आयोगाला अधिकृत मंजुरी देऊन त्याच्या अटी-शर्ती निश्चित केल्या. या बातमीचा देशभरातील सरकारी कर्मचार्यांना आनंद होणे स्वाभाविक आहे. पुढील १८ महिन्यांमध्ये आयोग शिफारसी सादर करणार असून, या आयोगाचा लाभ ५० लाख केंद्रीय सरकारी कर्मचारी आणि ६९ लाख निवृत्ती वेतनधारकांना होणार आहे. यावर्षी जानेवारीत आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेची घोषणा करण्यात आली होती; परंतु त्याची कार्यकक्षा निश्चित करण्यास दहा महिने लागले. बिहारमधील विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर केंद्राने वेतन आयोगाच्या मंजुरीची घोषणा केल्यामुळे हा राजकीय लाभ घेण्याचा प्रकार आहे, अशी टीका होईल; परंतु देशात कुठे ना कुठे निवडणुका होतच असतात. शिवाय प्रत्येक आयोगाची एक विशिष्ट मुदत असते आणि त्या वेळापत्रकानुसारच त्या त्या वेळी आयोग स्थापन केला जात असतो. केंद्र आणि राज्य शासन या दोन्ही पातळ्यांवर कर्मचार्यांचे वेतन निश्चित करण्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात निर्माण करण्यात आलेली एक प्रशासकीय व्यवस्था अथवा यंत्रणा म्हणजे 'वेतन आयोग'. केंद्रीय वेतन आयोगाचा स्वीकार पुढे विविध राज्य शासनांतर्फेही बहुतांश केला जातो. भारतीय राज्यघटनेत वेतन आयोगासंबंधी कोणतीही मार्गदर्शक तत्त्वे वा कलमे नाहीत. वेतन आयोग केंद्र शासनाकडे केंद्रीय कर्मचार्यांच्या वेतनवाढीसंबंधीच्या शिफारसी करतो.

शिफारसींचा अभ्यास करून केंद्र शासन वेतनवाढीबद्दलचा निर्णय जाहीर करते. केंद्रात वेतनवाढ लागू होताच वेगवेगळ्या राज्यांतील शासकीय कर्मचारीही पगारवाढीच्या मागणीसाठी अनेकदा रस्त्यावर उतरतात. अशावेळी केंद्राकडून राज्य कर्मचार्यांना सुधारित वेतन आयोगानुसार करण्यात आलेल्या शिफारसी लागू करण्याबाबत राज्यांना सुचवले जाते. आता आठव्या वेतन आयोगाच्या शिफारसीनंतर केंद्रीय कर्मचार्यांच्या मूळ वेतनात वाढ केली जाईल आणि त्याचा लाभ लाखो केंद्रीय कर्मचारी व निवृत्ती वेतनधारकांना होईल, असे केंद्रीय महिति व प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटले आहे. वेतन आयोग म्हणजे केवळ वेतनरचना नव्हे, तर भत्ते, निवृत्ती वेतन आणि महागाई भत्ता यांचाही आढावा वेतन आयोग घेत असतो. दर दहा वर्षांनी केंद्रीय कर्मचार्यांच्या वेतनाची पुनर्रचना करण्यासाठी नवा आयोग स्थापन केला जातो. २०१६ मध्ये लागू झालेल्या सातव्या वेतन आयोगानंतर गेली काही वर्षे केंद्रीय कर्मचारी वेतनवाढीची मागणी करत होते. सततची भाववाढ त्याचप्रमाणे मुलांच्या शिक्षणावरील तसेच वाहतुकीवरचा खर्च वाढलेला आहे. दैनंदिन खर्चातच एकूण वाढ झाली आहे. आगामी काळात आठवा वेतन आयोग १४ ते १८ टक्के किंवा ३० ते ३४ टक्के वेतनवाढ सुचवेल, असा अंदाज जाणकारांनी व्यक्त केला आहे.


मध्यम स्तरांवरील पदावर असलेल्या कर्मचार्यांना किमान १५ हजार ते १९ हजार रुपये प्रतिमहिना वेतनवृद्धी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अर्थात, आयोगाच्या शिफारसींची अंमलबजावणी १ जानेवारी २०२६ पासूनच होऊ शकते. वेतन सुधारण्यासाठी वापरण्यात येणारा 'फिटमेंट फॅक्टर' किती असेल, यावर वेतनात होणारी वाढ अवलंबून असते. हा फॅक्टर १.८३ राहिला, तर प्रभावी वेतनात (इफेक्टिव्ह सॅलरी) १४ टक्के वाढ होऊ शकते. हा फॅक्टर २.१५ असल्यास वेतनात ३४ टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते. 'फिटमेंट फॅक्टर' २.४६ असावा, अशी शिफारस झाल्यास वेतनात तब्बल ५४ टक्क्यांची वाढ होऊ शकते, असा अंदाज आहे. 'फिटमेंट फॅक्टर' म्हणजे वेतन आयोगाद्वारे सरकारी कर्मचार्यांच्या मूळ वेतनात सुधारणा करण्यासाठी वापरला जाणारा गुणक. सध्याची महागाई आणि इतर घटकांचा विचार करून या गुणकाची निश्चिती केली जाते. कर्मचार्यांच्या वेतनाचे सापेक्ष मूल्य राखणे आणि वेतन आयोगाच्या शिफारसी लागू झाल्यावर पगारात योग्य सुधारणा करणे, हा यामागील उद्देश असतो.

सातव्या वेतन आयोगाने 'फिटमेंट फॅक्टर' २.५७ असा निश्चित केला होता, हे लक्षात घेतले पाहिजे. याचा अर्थ, आता कर्मचार्यांच्या पगारात घसघशीत वाढ होण्याची शक्यता आहे; मात्र २०२३-२४ पासून केंद्र सरकारचा पेन्शनवरील खर्च पगारापेक्षा जास्त झाला आहे. येत्या केंद्रीय अर्थसंकल्पात पगारावर १.६६ लाख कोटी रुपये, तर पेन्शनवर २.७७ लाख कोटी रुपये खर्च होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. २०२३-२४ पूर्वी पगाराचा खर्च हा पेन्शनपेक्षा खूप जास्त होता. २०२२-२३ आणि २०२३-२४ दरम्यान सरकारी कर्मचार्यांच्या पगारावरील खर्चात १ लाख कोटी रुपयांची घट झाली. मुळात कर्मचार्यांचीच संख्या कमी होऊन आऊटसोर्सिंग वाढवल्याने हे घडले असावे. पगारावरील ओझे कमी झाले असले, तरी केंद्र शासनाच्या आस्थापनांवरील खर्चात वाढच होत आहे.

२०१७-१८ ते २०२५-२६ दरम्यान केंद्र सरकारने नियुक्त केलेल्या कर्मचार्यांची संख्या ३२ ते ३७ लाखांच्या दरम्यान राहिली आहे; परंतु पगार खात्यातील वाटप स्थिर राहिले आहे, तर भत्त्यांवरील खर्च २०२३-२४ पासून लक्षणीयरीत्या वाढला आहे. 'पगार खात्या'त आता महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इ. भत्ते समाविष्ट नाहीत, जे २०२३-२४ पासून भत्ते खात्यात (प्रवास खर्च वगळून) समाविष्ट केले गेले आहेत. याचा अर्थ, एकूण शासकीय खर्च कमी झालेला नाही, तर तो वेगवेगळ्या श्रेणींमध्ये पुनर्वर्गीकृत करण्यात आला आहे. आठव्या वेतन आयोगाच्या शिफारसी २०२७ किंवा २०२८ पासून लागू होण्याची शक्यता आहे. सरकार वेतन आयोग लागू करण्यासाठी जितका जास्त वेळ घेईल, तितकेच मूळ वेतनाच्या तुलनेत महागाई व इतर भत्त्यांचे प्रमाण वाढेल. एकीकडे दुष्काळ, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी यामुळे शेतकर्यांची हलाखी वाढत आहे. सरकारी कामाचा अनुभव लक्षात घेता प्रशासनातील गतिमानता आणि भ्रष्टाचारमुक्त कारभाराच्या सर्वसामान्यांसह सर्वच घटकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत, हे लक्षात घ्यावे लागेल. या पार्श्वभूमीवर, सरकारी कर्मचार्यांना समाजातील इतर वर्गापेक्षा अधिक लाभ मिळत असल्याने या अपेक्षापूर्तीचे आव्हानही आहे. नव्या आयोगासोबत नवी वेतनवाढही मिळणार असल्याने कर्मचारीवर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे.

# ३१ ऑक्टोबर सरदार वल्लभभाई पटेल जयंती.

प्रति, माननीय संपादकजी,
विषय:- लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे पोलादी व धारदार व्यक्तीमत्व.




गुजरात मधील नडियाद येथे ३१ ऑक्टोबर १८७५ ला सरदार वल्लभभाई पटेल नावाचा लोहपुरुष जन्माला आला आणि भारतीय राजकारणात एक पोलादी धारदार व्यक्तीमत्व उदयास आले. कारण त्यांनी देशांच्या स्वतंत्र लढ्यासाठी व स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताला एकसंघीकरण करण्यात मोलाचे योगदान दिले त्यामुळेच त्यांना लोहपुरुष व सरदार ही सर्वोच्च मानाची उपाधी मिळाली. पटेलांनी गुजरातच्या खेडा, आनंद जिल्ह्यातील बोरसद आणि सुरत जिल्ह्यातील बारडोली तालुक्यातील संपूर्ण ग्रामवासियांना संघटित करून त्यांनी इंग्रज अत्याचाराच्या विरूद्ध मोठा लढा उभारून सत्याग्रह केला.या सत्याग्रहानंतर प्रभावशाली नेता म्हणून गुजरातसह संपूर्ण भारतात त्यांची गणना होवू लागली.अशा परिस्थितीत त्यांनी मागे फिरून न पहाता एक पाऊल पुढे टाकून स्वतंत्र पुर्वकाळात व स्वातंत्र्योत्तर काळात मोलाची भुमिका बजावली व इंग्रजांशी लोहा घेण्याची शपथ घेतली. आज आपण त्यांच्या कामांचे अनुकरण करणे अत्यंत गरजेचे आहे.आपण त्यांची १५० वी जयंती साजरी करीत आहेत.त्यामुळे त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून आजचा राजकीय पुढारी देशासाठी काय-काय करू शकतात त्यावर नजर टाकने अत्यंत गरजेचे आहे.कारण वल्लभभाई पटेल यांनी कठोर परिश्रमाने आणि मोठ्या शिताफीने भारत पाकिस्तान फाळणी नंतर उफाळलेल्या हिंसाचारानंतर शांतता स्थापन करण्यासाठी मोठी मोलाची भुमिका बजावली व हिंदुस्थानातील ५६५ अर्धस्वायत्त संस्थानांचे भारतात विलीनीकरण करून घेणे हे भारतासाठी महान आणि मोलाचे कार्य पटेलांनी केले. हे कार्य जोपर्यंत सुर्य- चंद्र,आकाश-पाताळ आहे तोपर्यंत कोणीही विसरणार नाही हेही तितकेच सत्य आहे.त्यांच्यातील मुत्सद्देगिरी, कठोरपणा व वेळ पडल्यास सैन्यबळ वापरून सरदारांनी संस्थाने भारतात विलीन केले आणि म्हणूनच ते भारताचे लोहपुरुष म्हणून ओळखले जातात.त्याच्या या महान कार्यामुळे आपण समजू शकतो की भारताची एकता आणि अखंडता टिकवून ठेवण्यासाठी त्यांचे किती मोठे मोलाचे योगदान आहे हे दिसून येते.सरदार पटेल यांची कार्यशैली व देशासाठी दिलेले मोलाचे योगदान पहाता महात्मा गांधींनी सरदार वल्लभभाई पटेल यांना लौहपुरूष ही मोठी उपाधी दिली. त्यांची आठवण निरंतर भारतीयांच्या हृदयात रहावी या उद्देशाने गुजरात मधील नर्मदा येथील सरदार सरोवर बांधच्याजवळ सरदार वल्लभभाई पटेल यांची १८२ मीटर (५९७ फुट) उंच धातुंची प्रतिमा बनवीण्यात आली ही प्रतीमा स्टॅच्यु ऑफ युनिटी म्हणून जगप्रसिद्ध आहे. याठीकानी जगातील अनेक पर्यटक येवून आपली हजेरी लावतात ही देशासाठी मोठी गौरवास्पद बाब आहे.पटेलांनी देशाला एकत्रित बांधण्याकरीता नेहमीच कसोटीचे प्रयत्न केले. त्यामुळे लौहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून संपूर्ण भारतभर साजरी केली जाते. स्वतंत्रपुर्वकाळात प्रत्येक व्यक्ती देशासाठी बलिदान देण्यास तयार होते.त्यांच्यामुळेच आज आपण मोकळा श्वास घेत आहोत.लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करतांना राजकीय पुढारी, प्रशासन, सामाजिक संघटना यांनी त्यांची आठवण म्हणुन आजच्या दिवशी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून जयंती साजरी करावी.कारण देशात वाढते बदलते हवामान व प्रदुषण यावर आळा घालण्याचे काम वृक्षलागवडीच्या माध्यमातूनच होवू शकते. आजच्या दिवशी वृक्षलागवड झाली तर हि आठवण निरंतर काळापर्यंत राहील व प्रत्येक झाडात,पाणात,फुलात,फळात व मुळांमध्ये आपल्याला सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याचे अनुकरण होईलच सोबतच दर्शन सुध्दा अवश्य अवगत होईल. सरदार वल्लभभाई पटेलांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन.जय हिंद!

************

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार (स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# मॉडर्न मेडिसिनची गुणवत्ता जपा

नुकताच डॉक्टरांचा एकदिवसीय संप लक्षणीय ठरला. डॉक्टरांच्या या संपामुळे रुग्ण, जनताही संभ्रमात होती. 'मॉडर्न मेडिसीन' हा या मागचा खरा मुद्दा आहे. या संपामुळे सरकारला डॉक्टरांच्या रोषाला सामोरे जावे लागले.

महाराष्ट्र शासनाने होमिओपॅथिक डॉक्टरांना 'मॉडर्न मेडिसीन' म्हणजेच आधुनिक उपचारपद्धतीचा अवलंब करता यावा म्हणून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकमार्फत एक वर्षाचा उशीींळषळलरींश ऊीीश ळप चेवशीप झहरीरलेश्रेसू (उउचझ) हा अभ्यासक्रम तयार केला आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या होमिओपॅथिक डॉक्टरांना ॲलोपॅथीतील आधुनिक औषधांचा उपचारपद्धतीत अवलंब करता येईल हा यामागील मुख्य उद्देश आहे.

याच सर्व प्रक्रियेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण आणि औषध द्रव्य विभागाने ५ सप्टेंबर २०२५ रोजी परिपत्रक जारी करून उउचझ अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या होमिओपॅथिक डॉक्टरांची नोंदणी महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिलच्या स्वतंत्र रजिस्टरमध्ये करण्याचे निर्देश दिले आहेत;

परंतु याचा विरोध म्हणून एम.बी.बी.एस. डॉक्टरांची मुख्य संघटना असणार्या इंडियन मेडिकल असोसिएशन (खच-) व सर्व संलग्नित संघटनांनी तीव्र विरोध दर्शवला असून त्याच निर्णयाचा विरोध म्हणून एक दिवसाचा लाक्षणिक संप पुकारला होता. मुळातच होमिओपॅथी आणि ॲलोपॅथी उपचारपद्धती पूर्णपणे वेगळी असून त्यांच्या अभ्यासपद्धतीतही पूर्णपणे फरक आहे. परंतु उउचझच्या माध्यमातून एक वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केलेले होमिओपॅथिक डॉक्टरसुद्धा आधुनिक उपचारपद्धतीचा अवलंब करू शकतात.

ग्रामीण भागातील डॉक्टरांची कमतरता दूर करण्यासाठी आणि सरकारी योजनांद्वारे व्यापक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी होमिओपॅथिक डॉक्टरांसाठी हा धोरणात्मक निर्णय घेतला, असे महाराष्ट्र शासनाचे म्हणणे आहे; परंतु सत्यपरिस्थिती पाहिली तर आजघडीला महाराष्ट्राच्या कानाकोपर्यात वैद्यकीय अधिकार्यांच्या हजारो जागा रिक्त आहेत त्यावर शासन लवकर निर्णय घेत नाहीये. एमबीबीएस डॉक्टर हे ग्रामीण भागात सेवा देत नाहीत हा शासनाचा निष्कर्ष कोणत्या माहितीच्या आधारावर आहे यातसुद्धा कुठेही स्पष्टता नाही.

महाराष्ट्रमधील डॉक्टरांची तूट भरून काढण्यासाठी मागील काही वर्षांत सरकारने प्रतीवर्षी एमबीबीएसला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या एकूण जागा काही पटीने वाढवल्या आहेत. आजघडीला महाराष्ट्रामध्ये प्रतिवर्षी अकरा हजारपेक्षाही जास्त विद्यार्थी एमबीबीएसला ॲडमिशन घेतात. त्यामुळे भविष्यात आणखी मोठ्या संख्येने हे सर्व विद्यार्थी डॉक्टर म्हणून बाहेर पडणार आहेत. यातून बेरोजगारीची समस्या निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सध्या महाराष्ट्रामध्ये एमबीबीएस डॉक्टरांना एक वर्षाचा अनिवार्य असणारा सर्व्हिस बाँड करावा लागतो. यासाठीसुद्धा अनेक विद्यार्थ्यांना कुठेही लवकर जागा मिळत नाहीये. आज महाराष्ट्रामध्ये कुठेही एखादी वैद्यकीय अधिकार्यांची पदभरती निघाली तर कितीतरी पटीने एमबीबीएस डॉक्टरांचे अर्ज येतात. यातून महाराष्ट्रामध्ये रुग्णांना सेवा देण्यासाठी कुठेही डॉक्टरांची कमतरता आहे असे जाणवत नाही.




शासनाच्या या निर्णयामुळे विनाकारण होमिओपॅथी विरुद्ध ॲलोपॅथी हा वाद निर्माण झाला आहे. यामुळे सर्वसामान्यनागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होऊन रुग्णसेवेवरती याचा विपरीत परिणाम होत आहे.

या निर्णयामुळे रुग्णांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण होईल, आधुनिक वैद्यकीय शिक्षणाचा तसेच व्यवसायाचा दर्जा घसरेल तसेच राष्ट्रीय वैद्यकीय आयोग (एन.एम. सी.) आणि महाराष्ट्र मेडिकल कॉन्सिल कायद्याचे उल्लंघन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ५ सप्टेंबर २०२५ चे परिपत्रक तत्काळ रद्दबातल करावे, उच्च न्यायालयाच्या अंतिम निकालापर्यंत कोणतीही अंमलबजावणी करू आणि आधुनिक वैद्यकशास्त्राचे पावित्र्य राखत रुग्णांची सुरक्षितता सुनिश्चित करावी अशा मागण्या एमबीबीएस डॉक्टरांची अग्रगण्य संघटना असणार्या आय.एम.ए. कडून करण्यात आल्या आहेत.

सध्या केंद्र शासन आयुष मंत्रालयाच्या माध्यमातून आयुर्वेदिक, होमिओपॅथिक तसेच युनानी या उपचारपद्धतीमधील संशोधन आणि शिक्षणावर भर देत आहे. त्यामुळे, भविष्यात या सर्व उपचारपद्धती नवी भरारी घेतील यात कुठेही शंका नाही. शासनाने, सी.सी.एम. पी. कोर्सच्या माध्यमातून रुग्णांमध्ये साशंकता निर्माण करून होमिओपॅथीची स्वतंत्र ओळख पुसण्यापेक्षा होमिओपॅथीच्या माध्यमातून रुग्णांना सर्वोत्तम सुविधा देऊन रुग्णांचा विश्वास कसा संपादन करता येईल यावर भर द्यावा.

एमबीबीएसचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी सध्या अंदाजे साडेपाच वर्षांचा कालावधी लागतो, अनेक परीक्षांना त्यांना सामोरे जावे लागते, औषध उपचार करताना अनेक गोष्टींची काळजी घ्यावी लागते, अनेक औषधांमुळे रुग्णांवर दुष्परिणाम होण्याचीही शक्यता असते. त्यामुळे, एक वर्षाचा सीसीएमपी अभ्यासक्रम पूर्ण केलेले डॉक्टर्स या सर्व गोष्टींमध्ये तज्ज्ञ असतील का? हा प्रश्न शेवटी अनुत्तरितच राहतो.

# भारतीयांवर घाला

अमेरिकेच्या ट्रम्प प्रशासनाने भारताचा सूड उगवण्याचे जे सत्र आरंभले आहे ते रोज एका नवीन वळणावर जाताना दिसते आहे. ५०% आयात कर वाढीनंतर या सरकारने भारतीयांच्या एच वन बी व्हिसा वरील फी सहा लाखांवरून तब्बल सुमारे ९० लाख रुपयांवर नेली आहे, हा निर्णय केवळ विकृत सूड भावनेचा निर्णय आहे हे स्पष्ट दिसते आहे. अन्यथा, सहा लाखांची व्हिसा फी ९० लाखांवर नेण्याचे दुसरे कोणतेच संयुक्तिक कारण दिसत नाही. ट्रम्प प्रशासनाने घेतलेला हा निर्णय बहुतांशी भारतीयांच्या मुळावर उठणारा आहे, याचे मुख्य कारण असे की अमेरिकेत सध्या या वर्गवारीतील व्हिसावर जे परदेशी नागरिक काम करतात त्यातील सुमारे ७२ टक्के नागरिक भारतातील आहेत. त्यामुळे या निर्णयाचा भारतीयांवरच विपरीत परिणाम होणार आहे हे उघड आहे.



हा निर्णय जाहीर झाल्यानंतर ज्यांची मुले किंवा नातेवाईक अमेरिकेत या व्हिसावर गेले आहेत त्यांचे अक्षरशः धाबे दणाणले. अमेरिकेत काम करणार्या भारतीय नागरिकांना वर्षाला सरासरी जितका पगार मिळतो तेवढीच रक्कम व्हिसा फी म्हणून भरणे हे केवळ अशक्य आहे. ज्या कंपन्यांनी भारतीय नागरिकांना एच वन बी व्हिसावर कामावर ठेवले आहे त्यांना ही फी भरावी लागते. कुठलीही कंपनी एवढा भयंकर आर्थिक भार सोसू शकणार नाही. त्यापेक्षा सरळ सरळ भारतीय कर्मचार्याला मायदेशी पाठवणे हाच मार्ग त्या कंपन्या पसंत करतील. त्यामुळे तेथे काम करणार्या भारतीयांसह सगळेच जण ट्रम्प प्रशासनाच्या या माथेफिरू निर्णयाने हवालदिल झाले होते.

या अध्यादेशावर अध्यक्ष या नात्याने ट्रम्प यांनी स्वाक्षरी केल्यानंतर कंपन्यांनी भारतात सुट्टीसाठी गेलेल्या कर्मचार्यांना ईमेल पाठवून एका दिवसाच्या अवधीत अमेरिकेत परत येण्याची सूचना केल्याने अनेकांची जीवघेणी धावपळ झाली. पण त्यानंतर अमेरिकन प्रशासनाने खुलासा करून सध्या बाहेर गेलेल्या भारतीय नागरिकांना अमेरिकेत परतण्यासाठी लगेचच एवढी फी भरावी लागणार नाही किंवा त्यांचा व्हिसा रद्द केला जाणार नाही असे स्पष्ट केले, पण तोपर्यंत मात्र ज्यांची धावपळ झाली त्यांचे नुकसानच झाले. आता अमेरिकन प्रशासनाने आपल्या घोषणेबाबत पुन्हा एकदा स्पष्टीकरण देताना म्हटले आहे, की व्हिसा फी मध्ये करण्यात आलेली ही वाढ, सध्या ज्यांना व्हिसा मिळालेला आहे त्यांच्यासाठी लागू नसून ज्याला एच वन बी नव्याने मंजूर केला जाईल त्यांच्यासाठी ही वाढीव फी असेल.

या निर्णयामुळे सध्या या व्हिसा वर अमेरिकेत कार्यरत असलेल्या भारतीय नागरिकांनी सुस्कारा सोडला हे खरे आहे पण त्यांच्या व्हिसाची मुदत संपल्यानंतर नूतनीकरणाच्या वेळी त्यांना एवढी फी भरावी लागणार आहे किंवा कसे याविषयीसुद्धा अजून संदिग्धता आहे. नवीन एच वन बी साठी इतकी मोठी रक्कम आकारण्याचा निर्णयसुद्धा भारतीय विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी मोठे संकटच ठरणारा आहे, कारण भविष्यातील मोठ्या पगाराच्या नोकरीसाठी अमेरिकेत एमएसचे शिक्षण घेण्यासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांना ट्रम्प सरकारच्या या नव्या धोरणामुळे नोकरी मिळण्याची कोणतीच शाश्वती उरलेली नाही. त्यामुळे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना सक्तीने मायदेशीच परतावे लागणार आहे.

आपल्या मुलाला अमेरिकेत पाठवून तेथे उच्च शिक्षण देऊन नोकरी लागणे हे दिवास्वप्न अनेक भारतीय पालक पाहात असतात. त्यासाठी अक्षरशः लक्षावधी रुपयांचा खर्च त्यांना करावा लागतो. प्रसंगी पोटाला चिमटा घेऊन आणि भल्या मोठ्या रकमेचे कर्ज घेऊन भारतीय पालक आपल्या मुलाला अमेरिकेत शिक्षणासाठी पाठवतात. साधारणपणे तेथे शिक्षण पूर्ण करणार्या बहुतांश मुलांना अमेरिकेत नोकरी सहज उपलब्ध होत होती आणि त्यातून त्यांची कमाईसुद्धा बर्यापैकी होत होती. पण आता जर त्यांच्या कमाईच्या रकमेइतकीच व्हिसा फी आकारली जाणार असेल तर भारतीय पालकांचा आपल्या मुलांवर झालेला खर्च हा जवळपास वाया गेल्यातच जमा आहे.

ट्रम्प प्रशासनाच्या या निर्णयाला खुद्द अमेरिकेतूनच विरोध झाला असून या निर्णयाला आता तेथील नागरिक आणि कंपन्यांनी कायदेशीर आव्हान देण्याचा निर्णय घेतला आहे अशा बातम्या आल्या आहेत. या कायदेशीर प्रक्रियेतून जे काय व्हायचे ते होईल, पण ट्रम्प यांना ही अशी सुडात्मक भावनेची कृती का करावीशी वाटली याचा अंदाज अद्याप लागलेला नाही. हा निर्णय बहुतांशी भारताच्या विरोधातला निर्णय आहे याची जाणीव त्यांना झाली नसेल असेही मानता येणार नाही. ट्रम्प प्रशासनाने अलीकडच्या काळात लागोपाठ तीन मोठे निर्णय घेत भारताला मोठे धक्के दिले आहे. त्यातला पहिला निर्णय ५०% टॅरिफ वाढीचा आहे, दुसरा निर्णय चाबहार बंदराबाबतचा आहे आणि तिसरा आताचा व्हिसा फी वाढीबाबतचा आहे.

आतापर्यंत भारतीय नागरिक अशा समजात होते की, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यात खूप व्यक्तिगत मैत्री आहे. पण प्रत्यक्षात ट्रम्प हे भारताचे शत्रू असल्यासारखेच वागत आहेत. ट्रम्प प्रशासनाच्या अशा निर्णयांना मोदी सरकारकडून खमका विरोध किंवा प्रतिवाद केला जात असल्याचे दिसत नाही. भारतातील मोदी सरकार ट्रम्प यांच्या बाबतीत इतक्या बचावात्मक पद्धतीने का वागते याचाही उलगडा अजून झालेला नाही. व्हिसाबाबतच्या निर्णयाचे विश्लेषण करताना काही महाभागांनी असे तारे तोडले आहेत की, हा निर्णय म्हणजे भारतासाठी एक मोठी संधीच ठरणार आहे कारण, भारताबाहेर गेलेली ही सगळी प्रज्ञा आता पुन्हा भारतात परत येणार असल्याने त्याचा भारताला विकासासाठी उपयोग करून घेता येईल.

हा भंपक स्वरूपाचा युक्तिवाद आहे. अमेरिकेइतका पगार किंवा आर्थिक लाभ या लोकांना भारतात मिळणार आहे का, या प्रश्नाचे त्यांच्याकडे उत्तर नाही. अमेरिकेकडे जाणारा प्रज्ञा ओघ थांबला आणि तो भारतातच राहिला तर त्यांच्यासाठी भारत सरकार नेमक्या काय सोयीसुविधा उपलब्ध करून देणार आहे याची कोणतीही शाश्वती नाही. त्यामुळे कारणमीमांसा काहीही केली जात असली तरी ट्रम्प प्रशासनाचा हा निर्णय भारतावर घाला घालणाराच आहे.

# त्वचेच्या कॅन्सरचा धोका 'या' गोळीने कमी होतो? संशोधन काय सांगतं? तज्ज्ञांचा दावा काय?

गेल्या दशकभरात कॅन्सरग्रस्त (कर्करोग) रुग्णांची संख्या झपाट्याने वाढली आहे. जगभरातील अनेकांना या जीवघेण्या आजाराने जणू विळखाच घातला आहे. चिंताजनक बाब म्हणजे, कर्करोगग्रस्त रुग्णांमध्ये तरुण-तरुणींचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे दिसून येत आहे. ही संख्या दिवसेंदिवस वाढतच असल्याने त्याला रोखण्यासाठी सध्या भारतासह जगभरातील अनेक देशांत नवनवीन संशोधन केले जात आहे. यादरम्यान दैनंदिन वापरातील एका गोळीमुळे त्वचेच्या कर्करोगाच्या धोका कमी होऊ शकतो, असा दावा एका संशोधनातून करण्यात आला आहे. त्याविषयी

आरोग्य तज्ज्ञांच्या माहितीनुसार, ग्रामीण भागात तपासणीसाठी साधनसंपत्ती नसल्यामुळे अनेकांना कर्करोगाची लक्षणे लवकर समजत नाहीत. त्यातच आरोग्य सुविधा आणि जागरूकतेच्या अभावामुळे कर्करोगाचे निदान अंतिम टप्प्यात असल्यामुळे मृत्युदराचा धोकाही वाढतो आहे. यापार्श्वभूमीवर संशोधकांनी केलेल्या अभ्यासातून एक दिलासादायक बाब समोर आली आहे. 'निकोटिनामाइड' (व्हिटॅमिन बी-३) या गोळीने त्वचेचा कर्करोगाचा धोका कमी होतो, असे संशोधकांनी एका अहवालात म्हटले आहे.

अभ्यासातून नेमके काय समोर आले? कर्करोगाच्या औषधांवर संशोधन करणाऱ्या तज्ज्ञांनी आतापर्यंत 'व्हिटॅमिन बी-३' च्या संभाव्य फायद्यांकडे लक्ष वेधले होते. मात्र, अलीकडेच अमेरिकेत त्यावर एक नवीन संशोधन करण्यात आले. या संशोधनात ३३ हजारहून अधिक माजी सैनिकांचा समावेश करण्यात आला होता. अभ्यासातून असे दिसून आले की, दररोज व्हिटॅमिन बी-३ ची गोळी घेतल्यास त्वचेच्या कर्करोगाचा धोका लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतो. तसेच, जे लोक आधीच त्वचेच्या कर्करोगाचा सामना करीत आहेत, त्यांच्यासाठी ही गोळी अत्यंत गुणकारी आहे. या संशोधनाची व्याप्ती आणि स्पष्टता पाहता, त्वचेच्या कर्करोगावरील प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा पुनर्विचार करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

त्वचेच्या कर्करोगाची लक्षणे कोणती

सतत त्वचा सोलली जाणे हे त्वचेच्या कर्करोगाचे लक्षण असू शकते.

शरीराच्या कोणत्याही भागात सतत आणि कोणत्याही कारणाशिवाय खाज सुटणे.

त्वचेवरील नवीन डाग किंवा पुरळ येणे आणि जास्त दिवस ते तसेच राहणे.

त्वचेच्या जखमा बराच काळ बऱ्या न होणे हेदेखील कर्करोगाचे लक्षण असू शकते.

कान, मान किंवा खाजगी भागावर डाग किंवा लाल चट्टे तयार होणे.

शरीरावरील जळलेल्या त्वचेवरही कर्करोग होण्याचा धोका असतो.


जास्त वेळ उन्हात राहिल्याने त्वचेचा कर्करोगाचा धोका निर्माण होतो.

कमकुवत रोगप्रतिकारक शक्तीदेखील त्याचे कारण असू शकते.

त्वचेचा कर्करोग अनुवांशिक कारणांमुळेदेखील होऊ शकतो, असे तज्ज्ञ सांगतात.

त्वचेचा कोणता कर्करोग सर्वात धोकायदायक?

त्वचेचा कर्करोग हा जगातील सर्वात सामान्य कर्करोगाचा प्रकार मानला जातो. त्यामध्ये बेसल सेल कार्सिनोमा आणि स्क्वॅमस सेल कार्सिनोमा यासारखे दोन प्रकार आढळतात. त्यातील बेसल हा सर्वात धोकादायक आणि गंभीर प्रकार असल्याचे सांगितले जाते. दरवर्षी लाखो लोकांना या कर्करोगाची लागण होत असल्याचे समोर आले आहे. या आजारांचा संबंध प्रामुख्याने सूर्याच्या यूव्ही किरणांपासून गोऱ्या त्वचेशी आणि वाढत्या वयाशी जोडला जातो. सध्या अस्तित्वात असलेल्या प्रतिबंधात्मक उपायांमध्ये सूर्यप्रकाशापासून संरक्षण, सावलीचा वापर आणि सनस्क्रीनचा वापर यावर भर दिला जातो, परंतु तरीही या आजाराचे प्रमाण वाढतच आहे.



चिंताजनक बाब म्हणजे, एकदा त्वचेचा कर्करोग झालेल्या रुग्णांना पुन्हा-पुन्हा या आजाराचा सामना करावा लागत असल्याचे समोर आले आहे. यापार्श्वभूमीवर बाजारात स्वस्त आणि सहज उपलब्ध असलेल्या व्हिटॅमिन बी-३ च्या गोळ्या त्वचेच्या कर्करोगावर गुणकारी ठरत असल्याचा दावा केला जात आहे. संशोधकांच्या मते, 'निकोटिनामाइड' (व्हिटॅमिन बी-३) ही गोळी सूर्याच्या यूव्ही किरणांपासून झालेली त्वचेची हानी भरून काढते. त्याचबरोबर रोगप्रतिकारक शक्ती वाढवून शरीरातील असामान्य पेशी नष्ट करण्यात मदत करते.

संशोधन नेमके कसे करण्यात आले? अमेरिकेत करण्यात आलेल्या नवीन संशोधनात, १२ हजारांहून अधिक रुग्णांना दररोज दोनवेळा ५०० मिलीग्राम 'निकोटिनामाइड' देण्यात आले. हा प्रयोग सुमारे महिनाभरापेक्षा अधिक काळ करण्यात आला. त्यानंतर या रुग्णांची तुलना निकोटिनामाइडचे सेवन न करणाऱ्या दुसऱ्या रुग्णांबरोबर करण्यात आली. अभ्यासात असे समोर आले की, निकोटिनामाइड घेणाऱ्या रुग्णांमध्ये नवीन त्वचेचा कर्करोगाचा धोका १४ टक्क्यांनी कमी आढळला. विशेष बाब म्हणजे, ज्यांना आधीच त्वचेचा कर्करोग झालेला होता, त्यांच्यासमोरील पुढील कर्करोगाचा धोका तब्बल ५४ टक्क्यांनी कमी झाला होता. हा परिणाम त्वचेच्या दोन्ही मुख्य कर्करोगांवर (बेसल सेल आणि स्क्वॅमस सेल) सकारात्मक दिसून आला; पण स्क्वॅमस सेल कार्सिनोमा बाबतीत तो विशेष प्रभावी होता. व्हिटॅमिन बी-३ चे नियमित सेवन खरंच गुणकारी? बेसल सेल हा कर्करोग अधिक आक्रमक असतो आणि त्यात गुंतागुंत होण्याची शक्यता जास्त असते. तज्ज्ञांच्या मते, संशोधनाचे परिणाम आशादायी असले तरी निकोटिनामाइड हे पारंपारिक प्रतिबंधक उपायांची जागा घेऊ शकत नाही. त्वचेच्या कर्करोगापासून बचाव करायचा असेल तर सूर्याच्या यूव्ही किरणांपासून दूर राहावेच लागेल. त्यासाठी टोपी वापरणे, सावलीचा आसरा घेणे आणि सनस्क्रीन वापरणे गरजेचे आहे. व्हिटॅमिन बी-३ च्या गोळ्यांचे सेवन हे कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी वापरल्या जाणाऱ्या काही औषधांच्या तुलनेत अधिक परवडणारे आणि सुरक्षित परिणाम देणारे ठरू शकते. योग्य वेळी त्याचे सेवन करणे सुरू केल्यास त्वचेच्या कर्करोगाचा धोका टळण्यास मदत होते, असेही संशोधकांनी स्पष्ट केले.

आरोग्य तज्ज्ञांनी नेमका काय इशारा दिला? दरम्यान, या नवीन संशोधनामुळे त्वचेच्या कर्करोगाने त्रस्त असलेल्या रुग्णांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. संशोधकांनी या आजारापासून बचाव करण्यासाठी अनेकांना व्हिटॅमिन बी-३ चे नियमित सेवन करण्यास सल्ला दिला आहे. मात्र, या अभ्यासातील बहुतेक सहभागी गोरे पुरुष असल्याने हे निष्कर्ष सर्वसमावेशक लोकसंख्येसाठी कितपत लागू ठरतील, हे अजून स्पष्ट नाही. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, या संशोधनातून सर्व प्रश्नांची उत्तरे मिळाली असे म्हणता येणार नाही. व्हिटॅमिन बी-३ च्या गोळ्या नियमित घेतल्याने त्याचे वांशिक गटांमध्ये वेगवेगळे परिणाम दिसू शकतात, त्यामुळे रुग्णांनी डॉक्टरांच्या सल्ला घेतल्याशिवाय या गोळ्यांचे सेवन करू नये. या संशोधनाचा केंद्रबिंदू आधीच त्वचेचा कर्करोग झालेल्या रुग्णांवर होता, त्यामुळे ज्यांना हा आजार झालेला नाही, त्यांच्यासाठी व्हिटॅमिन बी-३ च्या गोळ्यांचे अतिसेवन धोकादायक ठरू शकते, असा इशाराही आरोग्य तज्ज्ञांनी दिला आहे.

# हार्ट अटॅकच्या 'या' पाच लक्षणांकडे अजिबात करू नका दुर्लक्ष, काळजी घेतल्यास वाचू शकतो जीव

आजकाल आपण अनेकदा अचानक हृदयविकाराचा झटका आल्याच्या बातम्या ऐकतो. मात्र हृदय कधीच अचानक बिघडत नाही. हॉर्ट अटॅक येण्याआधी आपलं शरीर आपल्याला काही इशारे देत असतं. नेमकी ही अडचण ही आहे की, आपण अनेकदा हे इशारे ओळखण्यात अपयशी ठरतो. तसंच या लक्षणांना आपण कामामुळे आलेला थकवा, गॅस, अपचन आणि ताण आहे असं समजतो. त्यामुळे गंभीर धोका उद्भवतो. हृदयरोग हा केवळ वृद्धांसाठीच गंभीर धोका नाही, तर तरूणांसाठीही वाढत जाणारा धोका आहे.



जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) मते, दरवर्षी जगभरात १.७९ कोटी लोकांचा हृदयरोगाने मृत्यू होतो. अनेक अभ्यासांमधून असे दिसून आले आहे की, दर पाचपैकी चार मृत्यू हृदयविकाराच्या झटक्यांमुळे होतात. हृदयविकाराचा झटका अचानक आणि अचानक येऊ शकतो. मात्र, शरीर अनेकदा ते होण्यापूर्वी काही इशारे देते. हे वेळीच ओळखल्याने जीव वाचू शकतो.

हृदयविकाराच्या झटक्याचे सर्वात सामान्य आणि ओळखता येणारे लक्षण म्हणजे छातीत दाब, जळजळ किंवा घट्टपणा जाणवणे. काही लोकांना छातीवर दगड ठेवल्याप्रमाणे वाटते, तर काहींना सुई टोचल्यासारखे वाटते. या वेदना काही सेकंदांपर्यंत टिकू शकतात आणि नंतर वाढतात. लोक अनेकदा या त्रासाला गॅस किंवा अपचन आहे असं समजतात. मात्र याकडे दुर्लक्ष करू नये. कारण ते हृदयविकाराचे पहिले लक्षण असू शकते.

श्वसनाचा त्रास जर तुम्हाला थोडे चालल्यानंतर, पायऱ्या चढल्यानंतर किंवा अगदी बसल्यानंतरही श्वास घेण्यास त्रास होत असेल, तर ते तुमचे हृदय योग्यरित्या पंपिंग करत नसल्याचे लक्षण असू शकते. याचा अर्थ तुमच्या शरीराला पुरेसा ऑक्सिजन पुरवठा होत नाही आणि तुम्हाला अचानक अशक्तपणा, चक्कर येणे किंवा घाम येणे जाणवू शकते. ही एक सामान्य समस्या आहे, जी प्रामुख्याने महिलांमध्ये दिसते. मात्र, ही एक गंभीर इशारादेखील असू शकते. पचनाच्या तक्रारी आणि उलट्या पचन आणि हृदयरोग यांच्यातील संबंधांबाबत बरेच लोक गोंधळलेले असतात. मात्र, महिलांमध्ये हृदयरोगाची लक्षणे नेहमीच पारंपरिक पद्धतीने ओळखली जात नाहीत. आपण अनेकदा उलट्या, ढेकर येणे, पोट फुगणे किंवा छातीत जळजळ होणे या समस्या गॅस आहे म्हणून दुर्लक्ष करतो. प्रत्यक्षात ही हृदयरोगाची सौम्य पण गंभीर लक्षणं आहेत.

शरीराच्या इतर भागात वेदना किंवा सुन्नपणा हृदयाचे दुखणे फक्त छातीपुरते मर्यादित नसते. ते बऱ्याचदा डाव्या खांद्यावर, हातावर, पाठीवर, मानेत किंवा जबड्यात पसरते. कधीकधी ते हातात सुन्नपणा किंवा मुंग्या येणे असेदेखील जाणवू शकते. यालाच रेफरल वेदना म्हणतात. म्हणजेच मूळ समस्या हृदयात असते, मात्र वेदना इतरत्र जाणवते. लोक अनेकदा याकडे दुर्लक्ष करतात आणि अधिक धोकादायक ठरते.

# घाईगडबडीच्या वेळी सकाळच्या नाश्त्यात बनवा खमंग टेस्टी नाचणीच्या पिठाचे थालीपीठ, पोट राहील भरलेले

सकाळच्या नाश्त्यात कायमच काय खावे? असे अनेक प्रश्न सगळ्यांचं पडतात. नाश्त्यात कांदापोहे, उपमा, शिरा किंवा इडली खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची सगळ्यांचं इच्छा होते. अशावेळी तुम्ही नाचणीच्या पिठाचे खमंग टेस्टी थालीपीठ बनवून खाऊ शकता. थालीपीठ बनवण्याची भाजणीच्या पिठाचा वापर केला जातो. पण घरात बऱ्याचदा थालीपीठ भाजणी उपलब्ध नसते. त्यामुळे नाचणीच्या पिठात तुम्ही इतरही वेगवेगळ्या धान्यांचे पीठ मिक्स करू शकता. संपूर्ण शरीरासाठी नाचणी अतिशय गुणकारी ठरते. नाचणीमध्ये असलेले घटक शरीराला कॅल्शियम देतात. याशिवाय रक्तात वाढलेली साखर नियंत्रणात ठेवण्यासाठी नाचणीची भाकरी किंवा नाचणीपासून बनवलेल्या पदार्थांचे सेवन करण्याचा सल्ला दिला जातो. लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं थालीपीठ खायला खूप जास्त आवडते.



नाचणीच्या पिठात असलेल्या गुणधर्मांमुळे शरीराला ऊर्जा मिळते आणि थकवा- अशक्तपणा कमी होतो. थंडीच्या दिवसांमध्ये नाचणी खाण्याचा सल्ला दिला जातो. नाचणीच्या सेवनामुळे आरोग्य सुधारते. चला तर जाणून घेऊया नाचणीचे थालीपीठ बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

नाचणीचे पीठ कांदा मीठ

हिरवी मिरची

लाल तिखट

हळद

तांदळाचे पीठ आलं लसूण पेस्ट गरम मसाला तीळ ओवा कोथिंबीर

कृती: नाचणीच्या पिठाचे थालीपीठ बनवण्यासाठी सर्वप्रथम, मोठ्या भांड्यात बारीक चिरलेला कांदा आणि कोथिंबीर, चवीनुसार मीठ घेऊन व्यवस्थित मिक्स करा.

कांदा हलकासा नरम झाल्यानंतर त्यात नाचणीचे पीठ, तांदळाचे पीठ, हळद, लाल मिरची पावडर जिरे, ओवा, तीळ, आले-लसूण पेस्ट,मीठ घालून व्यवस्थित मिक्स करा.

तयार केलेल्या पिठात आवश्यकतेनुसार गरम पाणी घालून पीठ व्यवस्थित मिक्स करा. तयार केलेला पिठाचा गोळा करून घ्या.

कॉटनच्या रुमाल पाण्यात भिजवून त्यातील जास्तीचे पाणी काढून घ्या. त्यानंतर पाटावर रुमाल टाकून तयार केलेल्या पिठाचा गोळा घेऊन एकसमान थापून घ्या.

रुमालासहित थालीपीठ गरम तव्यावर टाकून बाजूने तेल सोडा आणि दोन्ही बाजूने खमंग कुरकुरीत थालीपीठ भाजून घ्या.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले नाचणीचे थालीपीठ. हा पदार्थ लहान मुलांसह मोठ्यांना सुद्धा आवडेल.

# जागतिक संधिवात दिन : बैठ्या जीवनशैलीमुळे तरुणांनाही संधीवाताची झळ!

मुंबई : एकेकाळी वृद्धावस्थेत होणारा संधीवाताचा त्रास आता तारुण्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. बैठी जीवनशैली, ताणतणाव आणि अनुवांशिकतेमुळे तरुणांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये संधिवाताची समस्या वाढताना दिसत आहे.यासाठी वेळीच निदान, जीवनशैलीत बदल, फिजिओथेरपी आणि मिनीमली इन्हेसिव्ह प्रक्रियांसारख्या प्रगत उपचारांमुळे रुग्णांना सक्रिय जीवन जगता येणे शक्य आहे. जगभरात १२ ऑक्टोबर हा 'जागतिक संधिवात दिवस' पाळला जात असून तरुणांनो आता जागे व्हा, असा संदेश या निमित्ताने तज्ज्ञांनी दिला आहे.



भारतामध्ये वृद्धांचा आजार म्हणून ओळखला जाणारा संधीवात (ऑस्टिओआर्थ्रायटिस) आता तरुणांनाही गाठत आहे. एकेकाळी ६० वर्षांवरील लोकांपुरता मर्यादित असलेला हा विकार आता ४० ते ५० वयोगटात झपाट्याने वाढताना दिसतोय. ताज्या वैद्यकीय अभ्यासानुसार देशात सध्या सुमारे ६ कोटी २० लाख लोक संधीवाताने त्रस्त आहेत. त्यापैकी अंदाजे १.५ ते २ कोटी रुग्ण हे ५० वर्षांखालील आहेत. म्हणजेच कामकाजाच्या वयातील लोकसंख्येचा मोठा भाग या वेदनादायक आजाराच्या छायेखाली आहे.

वैद्यकीय संशोधन संस्थांच्या आकडेवारीनुसार १९९० मध्ये भारतात संधीवाताचे २३ दशलक्ष रुग्ण होते. केवळ तीन दशकांत हा आकडा तिप्पट झाला आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार जगभरात संधीवाताचे ५२ कोटीहून अधिक रुग्ण असून त्यापैकी ७३ टक्के वयोवृद्ध आहेत. उर्वरित जवळपास एक चतुर्थांश तरुण आणि मध्यमवयीन लोक आहेत.


सध्या २० ते ४० वयोगटातील तरुणांमध्ये संधिवाताच्या प्रकरणांमध्ये ४० टक्के वाढ झाल्याचे मुंबईतील ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. अमित ग्रोव्हर यांचे म्हणणे आहे. दर महिन्याला ओपीडीमध्ये उपचारांसाठी दाखल होणाऱ्या १० पैकी ४ व्यक्तींना सांधेदुखी आणि संधिवाताशी संबंधित कडकपणाची लक्षणे दिसून येतात. जास्त वेळ एकाच ठिकाणी बसुन राहणे, व्यायामाचा अभाव, बसण्याची चुकीची पध्दत, दुखापती, लठ्ठपणा, स्वयंप्रतिकार स्थिती, कौटुंबिक इतिहास आणि ताण हे घटक या स्थितीस कारणीभूत ठरतात. सांधे कडक होणे, वेदना, सूज, उष्णता, हाडांची लवचिकता कमी होणे आणि थकवा जाणवणे अशी लक्षणे दिसून येतात. जर संधिवाताकडे दुर्लक्ष केले तर दीर्घकालीन वेदना, सांध्यांमधील विकृती, अपंगत्व आणि जीवनाची गुणवत्ता खालावू शकते. नियमित व्यायाम, वजन नियंत्रणात राखणे आणि तणावाचे व्यवस्थापन करणे हे जीवनशैलीतील बदल या आजाराची प्रगती रोखण्यात मदत करतात असे त्यांनी सांगितले.

बरेच तरुण सांध्यामधील कडकपणा किंवा वेदनेकडे दुर्लक्ष करतात, परंतु ही संधिवाताची सुरुवातीची लक्षणे असू शकतात. तरुणांमध्ये संधिवाताच्या प्रकरणांमध्ये मोठी वाढ झाली आहे. महिन्याभरात १० पैकी २ व्यक्ती सांधेदुखी आणि स्नायुंचा कडकपणा यासारख्या समस्या घेऊन उपचारांसाठी रुग्णालयात दाखल होतात असे ऑर्थोपेडिक आणि जॉइंट रिप्लेसमेंट सर्जन डॉ. श्रीसनत राव यांनी सांगितले. लवकर निदान केल्याने सांध्यांची सूज नियंत्रित करण्यास, वेदना कमी करण्यास आणि दीर्घकालीन नुकसान टाळण्यास मदत होते. वेळोवेळी फिजिओथेरपी, औषधं आणि प्रगत उपचार प्रक्रिया रुग्णांना दीर्घकालीन आराम देतात आणि अपंगत्व टाळण्यास मदत करतात. नियमित शारीरिक हालचाली, निरोगी, संतुलित आहार, वजन नियंत्रित राखणे, तणावाचे व्यवस्थापन करणे आणि वैद्यकीय उपचारांनी या समस्येला प्रतिबंध करता येऊ शकतो. म्हणून, सुरुवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका आणि वेळीच वैद्यकीय मदत घ्यायला विसरु नका असेही डॉ राव म्हणाले.

पूर्वी ६० वर्षांवरील रुग्णांमध्ये संधीवात दिसायचा.आता ३५-४५ वयोगटातही हे निदान वाढले आहे. ही गंभीर सामाजिक आणि आर्थिक समस्या बनत चालल्याचे ठाणे जिल्हा रुग्णालयातील ज्येष्ठ ऑर्थोपेडिक सर्जन डॉ विलास साळवे यांनी सांगितले.अयोग्य जीवनशैली, वजनवाढ, बसून राहण्याची सवय आणि अपुरी शारीरिक हालचाल हे तरुणांमधील संधीवाताचे प्रमुख कारण ठरत आहेत. याशिवाय, क्रीडा दुखापती आणि कामाच्या ठिकाणी दीर्घकाळ बसण्याच्या पद्धतींमुळेही गुडघे व सांधे झिजतात. संधीवात आता केवळ वृद्धापकाळाशी निगडीत आजार राहिला नाही तर तो नव्या पिढीच्या जीवनशैलीचा परिणाम बनला आहे. सरकारी आरोग्य धोरणांमध्ये या वाढत्या संधीवाताच्या रुग्णसंख्येकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असल्याचेही डॉ विलास साळवे यांनी सांगितले.

# रक्तात इंचभरसुद्धा वाढणार नाही साखर! आहारात करा 'या' भाज्यांचा समावेश, मधुमेह- कोलेस्ट्रॉल कायमचे होईल गायब

मधुमेह झाल्यानंतर कायमच शरीराची काळजी घेण्याचा सल्ला दिला जातो. कारण मधुमेह कधीच बरा होत नाही. रक्तातील साखरेचे प्रमाण वाढल्यानंतर शरीरातील कोणत्याही अवयवाला इजा होण्याची जास्त शक्यता असते. त्यामुळे रक्तातील साखर कायमच नियंत्रणात असणे गरजेचे आहे. बऱ्याचदा चुकीच्या डाएट आणि जीवनशैलीतील बदलांमुळे रक्तात साखरेचे प्रमाण वाढते. रक्तात वाढलेल्या साखरेकडे दुर्लक्ष केल्यामुळे शरीराच्या कोणत्याही अवयवावर जखमा होऊन शरीराचे नुकसान होते. आहारात खाल्ले जाणारे गोड पदार्थ थेट शरीरावर परिणाम करतात. याशिवाय बैठी जीवनशैली, झोपेची कमतरता, शरीरात वाढलेल्या मानसिक तणावामुळे मधुमेहाचा धोका वाढतो. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला रक्तात वाढलेली साखर नियंत्रणात ठेवण्यासाठी कोणत्या भाज्यांचा आहारात समावेश करावा, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत.





मधुमेह नियंत्रणात ठेवण्यासाठी आहारात करा 'या' भाज्यांचा समावेश:

दोडका: अनेकांना भाज्या खायला अजिबात आवडत नाही. पण रोजच्या आहारात नियमित भाज्यांचे सेवन केल्यास शरीराला अनेक फायदे होतील. आठवड्यातून एकदा किंवा दोनदा दोडक्याच्या भाजीचे सेवन करावे. यामुळे शरीरात नैसर्गिक इन्सुलिनचे घटक वाढतात आणि शरीराच्या कार्यात अडथळे निर्माण होत नाहीत. दोडक्याची भाजी सहज पचन होते. याशिवाय शरीरात वाढलेली उष्णता कमी करण्यासाठी दोडक्याच्या भाजीचे सेवन करावे.

कोथिंबीर: जेवणातील सर्वच पदार्थांमध्ये भरपूर कोथिंबीर टाकली जाते. लहान मुलांना कोथिंबीर खायला आवडत नाही. पण मुलांना कोणत्या ना कोणत्या पदार्थांमधून कोथिंबीर खाण्यास द्यावी. कोथिंबीर खाल्ल्यामुळे इन्सुलिन संवेदनशीलता सुधारते, पचनसंस्था मजबूत राहण्यास मदत होते. शरीराला उज देण्यासाठी कोथिंबिरीची बारीक पाने अतिशय प्रभावी ठरतात.

शेगव्याच्या पानांची भाजी: रक्तात वाढलेली साखर नियंत्रणात ठेवण्यासाठी शेवग्याच्या पानांचे सेवन करावे. आठवड्यातून दोनदा किंवा तीनदा शेवग्याच्या पानांची भाजी बनवून खावी. याशिवाय सकाळी उठल्यानंतर उपाशी पोटी कोमट पाण्यात शेवग्याच्या पानांची पावडर मिक्स करून प्याल्यास शरीरात साचून राहिलेली घाण बाहेर पडून जाईल आणि रक्तातील साखर नियंत्रणात राहण्यास मदत होईल. मधुमेह झाल्यानंतर डोळ्या औषधांसोबतच शेवग्याच्या पानांचे आणि इतरही घरगुती पदार्थांचे आहारात सेवन करावे.

स्वादुपिंडातून इन्सुलिनचे उत्पादन कमी झाल्यास किंवा स्वादुपिंड तयार झालेले इन्सुलिन प्रभावीपणे वापरू शकत नसल्यास मधुमेहाचा त्रास होतो. मधुमेहाचे प्रकार कोणते आहेत? प्रकार १ मधुमेह, प्रकार २ मधुमेह, गरोदरपणातील मधुमेह (गरोदरपणात होणारा मधुमेह).

मधुमेह आणि हृदयविकार यांचा संबंध आहे का? होय, मधुमेहामुळे रक्तवाहिन्यांचे नुकसान होऊ शकते, ज्यामुळे हृदय आणि रक्ताभिसरणाचे आजार होण्याचा धोका वाढतो.

# व्ही एस पँथर्स च्या वतीने महाराणा प्रताप नगर मध्ये मोफत लील सेंटर आणि तीन शाखांचे अनावरण

लातूर :- लातूर शहरालगत असलेल्या महाराणा प्रताप नगर ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने जिल्हा कार्याध्यक्ष अकबर शेख यांच्या पुढाकाराने महाराणा प्रताप नगर मध्ये नागरिकांच्या सोयीसाठी मोफत सीएससी सेंटर सुरू करण्यात आले आहे याचे उद्घाटन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोद भाऊ खटके यांच्या शुभहस्ते संपन्न करण्यात आले. या उद्घाटन सोहळ्याला सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके, ग्रुप अध्यक्ष अमोल कांबळे, संपर्कप्रमुख आनंद जाधव मराठवाडा अध्यक्ष निलेश कांबळे शहराध्यक्ष असद शेख ,ऑटो युनियन जिल्हाध्यक्ष देवा गायकवाड, कामगार आघाडी जिल्हा संघटक गोविंद कांबळे ,कामगार आघाडी शहराध्यक्ष गौस शेख, शहर सचिव संजय सुरवसे ,शहर उपाध्यक्ष यासिन शेख आदींची प्रमुख उपस्थिती होती .





यानंतर महाराणा प्रताप नगर मध्ये विनोद भाऊ खटके यांच्या हस्ते तीन शाखांचे अनावरण करण्यात आले . यानंतर शाखेवरील पदाधिकाऱ्यांचा एकत्रितपणे मेळावा घेण्यात आला यावेळी बोलताना सं अध्यक्ष विनोद भाऊ खटके यांनी आवाहन केले की दलित मुस्लिम ओबीसी समाज एकत्रित आल्याशिवाय आपल्या हक्कांचे आणि अधिकारांचे रक्षण करता येणार नाही दलित मुस्लिम ओबीसी एकत्रित राहणे ही काळाची गरज आहे काळाची पावले ओळखून आपण सर्वांनी संघटित व्हावे असे सांगितले. या मेळाव्यामध्ये सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांचा जिल्हा कार्याध्यक्ष अकबर शेख यांनी सपत्नीक सत्कार केला. यानंतर विनोद भाऊ खटके यांच्या हस्ते शाखेवरील नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला आणि संघटनेमध्ये त्यांचे स्वागत करण्यात आले. या शाखेच्या अनावरणासाठी संपर्कप्रमुख आनंद जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा कार्याध्यक्ष अकबर शेख आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## ऊसतोड कामगारांना डीबीटीद्वारे मदतीचा प्रस्ताव सादर करावा

मुंबई : प्रतिनिधी राज्यात ऊस तोडणीचा हंगाम सुरू झाला असून, अवकाळी पावसामुळे ऊसतोड कामगारांचे हाल होऊ नयेत म्हणून त्यांना तात्काळ मदत मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे ऊसतोड कामगारांना डीबीटी प्रणालीद्वारे आर्थिक मदतीचा प्रस्ताव सहकार विभागाने सादर करावा, अशी सूचना विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गो-हे यांनी केली. विधान भवनात उसतोड कामगारांच्या कल्याणार्थ प्रस्तावित चर्चा व पुढील दिशा ठरविण्याच्या अनुषंगाने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, अपर विभागीय आयुक्त कोकण सिद्धराम सालीमठ राज्य कुटुंब कल्याण कार्यालय पुण्याचे उपसंचालक डॉ. आशिष भारती उपस्थित होते.

उपसभापती डॉ. गो-हे यांनी सांगितले की, ऊसतोड कामगार हे राज्याच्या साखर उद्योगाचे कणा आहेत. अवकाळी पावसामुळे त्यांचे नुकसान होत असून, त्यांच्या अडचणींचा विचार करून तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यामुळे गमबूट, इलेक्ट्रिक कोयता, सॅनिटरी नॅपकिन, ग्ल्व्हज् या आवश्यक गोष्टी वेळेत मिळण्यासाठी डीबीटीद्वारे मदत देणे सुलभ होईल. त्याचसोबत फिरत्या स्वच्छतागृहांची व्यवस्था ग्रामीण विकास विभागामार्फत व संबंधित विभागामार्फत करण्याच्या न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी गरजेची आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

ऊसतोड कामगारांच्या आरोग्य सेवेसाठी त्यांच्या कामाच्या ठिकाणी आठवड्यातून फिरता दवाखाना व महिला कामगारांसाठी स्त्रीरोगतज्ज्ञांची देखील सुविधा उपलब्ध करून द्यावी. तसेच महिला ऊसतोड कामगारांसाठी प्रसूती रजा मातृत्व योजनेचा लाभ देण्याबाबतही विचार करण्यात यावा, असेही उपसभापती डॉ. गो-हे यांनी यावेळी सांगितले.

## चार मंत्र्यांच्याच मतदारसंघात अतिवृष्टीग्रस्त शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत!



नाशिक : प्रतिनिधी राज्यातील शेतकरी अतिवृष्टीने संकटात सापडले आहेत. राज्य शासनाने त्यासाठी पॅकेज जाहीर केले आहे. मात्र तांत्रिक अडचणींमुळे शेतकरी पॅकेजच्या लाभापासून दूरच आहेत. नाशिक जिल्ह्यात कांदा पीक सतत अडचणीत असते. यंदाच्या अतिवृष्टीने अधिक संकटात असलेल्या कांदा उत्पादकांना दुसरा शॉक बसला आहे. द्राक्षांसह बहुतांशी पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतक-यांना मदतीची घोषणा केली होती. त्यासाठी सुमारे चाळीस हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर झाले. त्यात अतिवृष्टीग्रस्त शेतक-यांना मदत देण्यात येत आहे. विशेष म्हणजे नाशिक जिल्ह्यात चार मंत्री आहेत. यातील बहुतांश मंत्री राज्यभर विविध प्रश्नांवर आवाज उठवतात. राज्याचा कारभार हातात. मात्र त्यांच्या स्वत:च्याच मतदारसंघात परिस्थिती विपरीत आहे.

नाशिक जिल्ह्यात मात्र परिस्थिती वेगळीच आहे. फार्मर्स आयडी आणि अन्य तांत्रिक अडचणींमुळे शेतक-यांना मदत मिळालेली नाही. बहुतांश शेतकरी या मदतीपासून वंचित राहिल्याने असंतोषाचे वातावरण आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या येवला मतदारसंघात शेतकरी त्रस्त आहेत. येथील ६२,७९८ शेतक-यांना निसर्गाचा दणका बसला. यातील अवघ्या ८,४५७ शेतक-यांना मदत मिळाली. ५४,३१४ शेतकरी अद्यापही फार्मर्स आयडीअभावी मदतीपासून वंचित आहेत.

क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या सिन्नर मतदारसंघातही स्थिती वेगळी नाही. येथे १४,७०५ शेतक-यांचे नुकसान झाले. यातील ६,३५९ शेतक-यांना मदत मिळाली, ८,३४६ शेतकरी मदतीपासून वंचित आहेत. शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या मालेगाव बा मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर शेतकरी शासनाच्या मदतीसाठी टाहो फोडत आहेत. येथील ८७,१११ शेतक-यांवर निसर्गाची अवकृपा झाली. यातील अवघ्या २६,७०३ शेतक-यांना मदत मिळाली. ६०,४०८ शेतकरी तांत्रिक पूर्तता करण्यात कमी पडल्याने मदत मिळाली नाही. एकंदरच राज्यभर ही स्थिती निर्माण झाली आहे. जिल्ह्यात तीन लाख ५ हजार शेतक-यांचे नुकसान झाले मात्र आतापर्यंत अवघ्या एक लाख १३ हजार शेतक-यांनाच मदत मिळाली आहे. राज्याचे नेतृत्व करणा-या मंत्र्यांनाच आपल्या मतदारसंघातील शेतक-यांना शासकीय समन्वय निर्माण करून देण्यात यश आलेले नाही. त्याचा फटका थेट शेतक-यांना बसला आहे. पंचनामा झाल्यानंतरही अतिवृष्टी झाल्याने शेतकरी पूर्णत: खचला आहे. आता त्याच्या मार्गात शासकीय मदतीसाठी फार्मर्स आयडीच्या अडथळ्यांची शर्यत आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीकडून अपेक्षित प्रतिनिधित्व मिळेल : प्रा. जोगेंद्र कवाडे

लातूर : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीतील प्रमुख घटक पक्ष असणाऱ्या शिवसेनेकडून पीपल्स रिपब्लिकन पार्टीला अपेक्षित प्रतिनिधित्व मिळेल असा विश्वास पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी खासदार प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी गुरुवारी लातुरात पत्रकारांशी बोलताना दिली.

पीपल्स रिपब्लिकन पार्टीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेशी युती केली आहे. आपल्या पक्षाने राज्यात महायुतीच्या यशामध्ये मोलाचे योगदान दिले आहे. आपण शिवसेनेच्या नेत्यांशी संपर्कात आहोत. त्यांच्याकडून स्थानिक स्वराज्याच्या निवडणुकीत अपेक्षित प्रतिनिधित्व मिळेल अशी अपेक्षा आहे. जर शिवसेनेने आपल्या अपेक्षा नाही पूर्ण केल्या तर आपण भविष्यात निश्चित वेगळा विचार करू असे सांगतानाच त्यांनी महायुती आपल्यावर तशी वेळ येणार नाही असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. सध्यस्थितीत शिक्षणाचे मोठ्या प्रमाणावर व्यापारीकरण होत आहे.



ते सामान्य परिवारातील विद्यार्थ्यांसाठी घातक आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत शिक्षणाचे व्यापारीकरण केले जाऊ नये. अट्रासिटीचा कायदा अत्याचारापासून वाचविण्यासाठी आहे. त्याकरिता जलदगती न्यायालयाची स्थापना केली जावी. फुले, शाहू, आंबेडकरांच्या राज्यात बौद्ध व अनुसूचित जातीच्या लोकांवर खोटे गुन्हे नोंद केले जात आहेत, ही बाब खेदजनक असल्याचेही त्यांनी बोलून दाखवले. राज्यातच नव्हे तर देशात समान शिक्षण पद्धती लागू करण्यात यावी, अशी मागणीही प्रा. कवाडे यांनी केली. मागास प्रवर्गाच्या विकासासाठी असणारा समाज कल्याण विभागाचा निधी पूर्णतः खर्च केला जात नाही. त्याची चौकशी करावी. तसेच एका आर्थिक वर्षात खर्च न झालेला निधी न गोठवता तो पुढील आर्थिक वर्षात समाविष्ट करण्यात यावा. कर्नाटकाप्रमाणे महाराष्ट्रातही अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती लागू करावी. शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना वेळेत देण्यात यावी. भूमिहिन शेतमजुरांना न्याय देण्यात यावा. देशातील प्रत्येक मंदिर किंवा मस्जिद त्या त्या धर्मियांच्या ताब्यात आहेत. फक्त महाबोधी महाविहार बुद्धगया हे अन्य धर्मियांच्या ताब्यात आहे. ते लवकरात लवकर बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे,अशी मागणीही प्रा. कवाडे यांनी केली. याप्रसंगी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे महाराष्ट्र संघटक तथा लातूर जिल्हाध्यक्ष एन.डी. सोनकांबळे, सुमेध सोनकांबळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## खासगी कोचिंग क्लास तपासणीसाठी समिती गठित करावी

मुंबई : प्रतिनिधी मुंबई शहरात सुरू असलेल्या खासगी कोचिंग क्लासची तपासणी करण्यासाठी बृहन्मुंबई महापालिकेने सर्व संबंधित अधिका-यांची समिती गठित करावी. या समितीने मुंबईमधील खासगी कोचिंग क्लासची तपासणी करून १५ दिवसांत अहवाल सादर करावा असे, निर्देश विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले. अभियांत्रिकी व वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांना आकर्षित करण्याकरिता खासगी क्लासेसकडून विद्यार्थ्यांची फसवणूक केली जाणे, मुंबईत ॲलन क्लासेसच्या अनेक शाखा कार्यरत असणे, यासंदर्भात पावसाळी अधिवेशन २०२५ मध्ये विधान परिषद सदस्य राजेश राठोड यांच्या लक्षवेधीबाबत सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवनात नुकतीच बैठक झाली.

या बैठकीस शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, आमदार राजेश राठोड, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांच्यासह शिक्षण विभाग आणि मुंबई महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रात तसेच राज्यात अनेक खासगी कोचिंग क्लास सुरू आहेत. क्लास सुरू असलेली जागा, क्लासच्या ठिकाणी अग्निसुरक्षा, पार्किंग याबाबतची व्यवस्था, प्रत्यक्षात विद्यार्थ्यांकडून मोठे शुल्क आकारून कमी रक्कम दाखविणे आणि यात कर चोरी करणे, निवासी संकुल परवानगी असलेल्या इमारतीत खासगी क्लास सुरू करणे आणि अनधिकृत बांधकाम याबाबतची सर्व तपासणी करण्यात यावी. तसेच विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणा-या शुल्काबाबतही संबंधित विभागाने तपासणी करावी, असे निर्देश विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले.

## मुक्त विद्यापीठ योग शिक्षणक्रम विद्यार्थिनी पुण्याच्या कु. मयुरी शेलारचा विक्रम ‘इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड’मध्ये

नाशिक (प्रतिनिधी) :- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या योग शिक्षणक्रमाची विद्यार्थिनी कु. मयुरी विजय शेलार हिने ‘इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स’ मध्ये आपले नाव नोंदवले आहे. तिने केवळ ३० सेकंदात ४७ ‘चक्रासन पुश-अप्स’ करण्याचा विक्रम करून दाखवला आहे. कु. मयुरी मुक्त विद्यापीठाच्या पुणे येथील न्यू एज्युकेशन सोसायटी अभ्यास केंद्राची विद्यार्थिनी आहे. तिने याआधी मुक्त विद्यापीठाचा योगशिक्षक पदविका शिक्षणक्रम पूर्ण केला असून सध्या ती विद्यापीठाचाच एम.ए. योग (प्रथम वर्ष) शिक्षणक्रम शिकत आहे. कु. मयुरीने दिनांक २६ सप्टेंबर २०२५ रोजी हा पराक्रम केला. ज्यास नुकतीच ’इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड अचिव्हर’ म्हणून मान्यता मिळाली आहे. या विक्रमासाठी तिला न्यू एज्युकेशन सोसायटी अभ्यास केंद्रप्रमुख डॉ. गिरीश धडफळे, योगशिक्षिका श्रीमती सुवर्णा भापकर तसेच सानिका बाम यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. ‘इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स’च्या प्रतिनिधी तथा रेकॉर्ड मॅनेजर मानसी सतेजा यांनी या विक्रमाची नोंद केली. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, व्यवस्थापन मंडळ सदस्या डॉ. संजीवनी महाले, प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, पुणे विभागीय केंद्र संचालक डॉ. व्ही. बी. गायकवाड व आरोग्य विज्ञान विद्याशाखा संचालिका डॉ. रश्मी रानडे यांनी या विक्रमाबद्दल कु. मयुरी शेलारचे अभिनंदन केले आहे. आपल्या या यशाबद्दल बोलताना मयुरीने आनंद व्यक्त करत म्हटले की, मुक्त विद्यापीठातून योग डिप्लोमा आणि एम.ए. योग करत असताना मला खूप काही शिकायला मिळत आहे. अभ्यासकेंद्रातील शिक्षक व अधिकारी कर्मचारी यांचे उत्तम सहकार्य लाभले. मी याबद्दल सर्वांची आभारी आहे.




## बीएमसी निवडणुकीसाठी शिंदे गटाचा मास्टर प्लॅन; घेतला ‘हा’ मोठा निर्णय



मुंबई : येत्या काही दिवसांमध्ये महापालिकेच्या निवडणूका पार पडणार आहेत. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना शिंदे गटाने आतापासूनच मुंबईमध्ये संघटनात्मक हालचाली सुरू केल्या आहेत. शहरातील प्रत्येक विभागात ‘मायक्रो प्लानिंग’ सुरु केले आहे. तसेच स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांना नव्या जबाबदाऱ्या दिल्या जात आहेत. शिंदे गटाचा मास्टरप्लॅन विभागप्रमुखांच्या नियुक्तीवरून काही दिवसांपूर्वी निर्माण झालेल्या नाराजीवर पडदा टाकण्यासाठी पक्षाने चातुर्याने पावले उचलली आहेत. नाराज माजी विभागप्रमुखांना विभाग समन्वयक आणि शाखा समन्वयक अशी पदे देत त्यांची मनधरणी करण्यात आली आहे. या नव्या रचनेनुसार प्रत्येक वॉर्डात महिला आणि पुरुष अशा मिळून ५० पेक्षा जास्त कार्यकर्त्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. गेल्या दोन महिन्यांत सुमारे अडीच ते तीन हजार नियुक्त्या करण्यात आल्याचे समजत आहे. मतदारयादीवर शिंदे गटाकडून लक्ष मुंबईतील एकूण २२७ वॉर्डांपैकी तब्बल ८० टक्के वॉर्डांमध्ये गटप्रमुखांची नेमणूक पूर्ण झाली आहे. या मोर्चेबांधणीसोबतच आता शिंदे गटाने मतदारांच्या थेट संपर्कावर भर दिला आहे. ‘शिवदूत’ आणि ‘लक्षवेध’ या पथ्या माध्यमातून घराघरांत पोहोचून मतदारांची माहिती पडताळण्याचे काम सुरू आहे. गटप्रमुखांना मतदार याद्यांमधील प्रत्येक नावाची घराघरांत जाऊन तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच ज्या भागांत पक्षाचे वर्चस्व कमी आहे, त्या ठिकाणी सकारात्मक वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी विभागप्रमुख आणि शाखाप्रमुखांवर सोपवण्यात आली आहे. राज्यातील सर्वात प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या मुंबई महापालिकेची निवडणूक जिंकून ठाकरेंना धक्का देण्यासाठी शिंदे गटाकडून जोरदार ‘ग्राऊंड वर्क’ सुरू असल्याचे समजत आहे.

# महाराष्ट्रातला मोर्चा दणदणीत झाला पाहिजे

मुंबई : प्रत्येक राजकीय पक्षाच्या आणि मतदाराच्या मनात जी शंका निर्माण झाली आहे. त्याची एक गोष्ट दुबार मतदार याद्यांची सुरू आहे. मात्र फक्त तिकडे लक्ष ठेवून चालणार नाही. २०१७ पासून मी ओरडून सांगतोय, त्यावेळी मी जे बोलत होतो, आज जे सोबत आहेत त्यांनी गांभीर्याने घेतले नाही. मतदार याद्या आहेतच, पण ईव्हीएम मशिनकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. स्वप्नांची राखरांगोळी जर ईव्हीएम मशीन करणार असेल तर निवडणुकीचा उपयोग काय असा सवाल करत राज ठाकरे यांनी मतचोरीवर भाष्य केले. प्रत्येकवेळी महाराष्ट्राने पुढाकार घेतला आहे. त्यामुळे मतचोरी मुद्यात महाराष्ट्रच पुढे येईल असे त्यांनी सांगितले. मनसेच्या पदाधिकारी संवाद मेळाव्यात ते बोलत होते.

यात राज ठाकरे म्हणाले की, गेली अनेक वर्ष आपण हे ओरडून सांगतोय. मागील १०-१२ वर्षात हे सुरू झाले आहे. लोक आपल्याला मतदान करतायेत. पण या भानगडीतून आपल्याला दरवेळी पराभव पत्करावा लागतो. अख्खा देश यावर बोंबलतोय. या प्रक्रियेतून सत्तेत यायचे आणि हवी तशी सत्ता राबवायची. मतदार याद्या स्वच्छ करा अजून १ वर्ष निवडणुका लागल्या नाही तरी चालेल.

मतदार याद्या स्वच्छ करा आणि निवडणूक घ्या, तुम्ही जिंकला ते आम्ही मान्य करू. सगळ्याळ्या गोष्टी लपवायच्या आण त्यातून निवडणूक घ्यायची, म्हणजे मॅच फिक्स आहे. क्रिकेटमध्ये मॅच फिक्सिंग झाल्यावर खेळाडूंना काढण्यात आले. सीसीटीव्ही कॅमे-यातील शुटींग ही प्रायव्हेसी आहे. एखादा माणूस मत कुठे देतोय ही प्रायव्हसी असू शकते.



निवडणूक आयोग कुठलीही उत्तरे देतो अशी टीका त्यांनी केली.

तर महाराष्ट्रात जो मोर्चा निघेल तो दणदणीत झाला पाहिजे. महाराष्ट्रात काय आग पेटलीय हे दिल्लीला कळायला हवे. मोर्चात सहभागी होऊन महाराष्ट्रात काय राग आहे तो दाखवून द्या. महाराष्ट्रातल्या आणि देशातल्या प्रामाणिक मतदारांचा हा अपमान सुरू आहे. मतदार उन्हात रांगेत उभे राहत आहे. मात्र त्यांच्या मताचा अपमान केला जात आहे. या देशातील निवडणुका पारदर्शक झाल्या पाहिजेत. जय कुणाचा पराजय कुणाचा हे निवडणुकीनतंर पाहता येईल. प्रगत देशात आजही बॅलेट पेपरवर मतदान होतात. जेवढे पुढारलेले देश आहे तिथे बॅलेट पेपर वापरला जातो. १ तारखेच्या मोर्चाला मी लोकलने जाणार आहे असे राज ठाकरे यांनी म्हटले.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं.१०, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर-४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास खडक हनुमान मंदिर मिलिंद नगर लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.